संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# थर्टीफर्स्टच्या लखलखाटात लपलेला लकवा

सध्याच्या विज्ञानयुगामुळे मनुष्याचा सर्वाधिक फायदा झाला असेल तर त्याला असे वाटते की, आपले आयुर्मान वाढले आहे. नवनवीन शोधांमुळे अनेक प्रकारची औषधं, यंत्रं निर्माण झाली. पूर्वी रोगराईमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक होती. मनुष्याचे आयुष्यमान कमी होते. आज विज्ञानामुळे त्याचे वयोमान वाढले. जगातील कोणतीही व्यक्ती सरासरी ८० ते ९० वर्षे जगू लागली आहे. ही गोष्ट गेल्या दशकापर्यंत पूर्णसत्य मानता येत होती. आता ती अर्धसत्य ठरत आहे. विज्ञानामुळे अनेक सुखसाधने उपलब्ध झाली. मनुष्याचे श्रम, कष्ट कमी झाले. आता त्याच विज्ञानाने काही नुकसानही होत आहे. या सुखासाठीच्या ताणतणावात त्यानेच स्पर्धा निर्माण केल्या आहेत. याच नव्या नव्या शोधातून नको त्या गोष्टींचीही निर्मिती झाली आहे. दहा वर्षांपूर्वीची परिस्थिती आणि आजची स्थिती पाहिली तर मनुष्य जास्त अस्वस्थ आणि व्यसनाधीन झाला आहे. भारतासारख्या देशात त्याचे परिणाम वेगळ्याच स्वरूपात समोर येत आहेत. सर्वाधिक तरुणांची संख्या असलेला भारतातील अधिकाधिक तरुण मादक पदार्थांच्या व्यसनात अडकत आहे. या गंभीर संकटाने आता धोक्याचा कंदील दाखवला आहे. आणि म्हणूनच आता अगदी थर्टीफर्स्टच्या पार्ट्यांमध्ये होणारी मादक आणि मद्य पदार्थांची रेलचेल चिंताजनक वाटते आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही थर्टीफर्स्टच्या मौजमजेची जोरदार तयारी सुरू आहे. मोठमोठी हॉटेल्स, मॉल्स मॉटेल्स, पब्ज, बिअर बार ते अगदी खेड्यापाड्यात गावाबाहेरच्या चौफुलीवरच्या ढाब्यांवर या पार्ट्या रंगवण्याची सर्व प्रकारची तयारी पूर्ण होत आली आहे. पोलिसांच्या दृष्टीने मात्र प्रामुख्याने या थर्टीफस्टच्या पार्ट्या म्हणजे दक्षता आणि सुरक्षितता अशा दोन्ही दृष्टीने सर्वात मोठी कसोटी ठरू लागली आहे. मावळत्या वर्षाला निरोप देण्याचे निमित्त किंवा नव्या इंग्रजी वर्षाच्या स्वागताचे औचित्य साधण्याचा दिखाऊपणा केला जातो. प्रत्यक्षात या पार्ट्यांमधून अनावश्यक प्रकारचा धुमाकूळ वाढताना दिसतो. सध्या तर पोलिसांना या पार्ट्यांमध्ये सहभागी होणाऱ्या तरुणांवरच जास्त लक्ष द्यावे लागते. गेल्या वर्षापासून मुंबईत एमडी नावाच्या मादक पावडरने तरुणांना वेठीला धरले आहे. चांगल्या सुशिक्षित घरातले, हुशार तरुण या व्यसनाला बळी पडत आहेत. थर्टीफर्स्टच्या पार्ट्यांमध्ये एमडी पावडरबरोबरच अन्य मादक पदार्थांचा वापर होत असतो. त्याकडेही लक्ष द्यावे लागणार आहे. थर्टीफर्स्टचा हा लखलखाट,चमचमाट तरुणाईला भुरळ घालणारा असतो.परंतु या लखलखाटात तरुणाईच्या व्यसनाधीनतेचा लकवा दडलेला असतो. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

## आयुष्यमान वाढते आहे

सामाजिकदृष्ट्या या भयानकतेचे वास्तव तितक्याच गांभिर्याने समजून घ्यावे लागेल. विज्ञानयुग म्हणजे आधुनिकता आणि आधुनिकता म्हणजे नीतिमूल्ये न बाळगण्याची बेपर्वाई अशी ठाम समजूत तयार झाली आहे. भारतात प्राचीन काळातही गांजा, अफूसारखी व्यसने होती.परंतु त्याचा आरोग्यावर खूप विपरित परिणाम होत नव्हता. आताची नवी मादक व्यसने म्हणजे मन आणि मेंदू या दोघांनाही निकामी करण्याचे काम करीत आहेत. घरातला एकुलता एक आणि अभ्यासात हुशार मुलगा कॉलेजमध्ये चुकून कुठेतरी एकदाच या एमडीसारख्या पावडरच्या आहारी जातो. आणि स्वत:बरोबर सगळ्या घराचीच राखरांगोळी करून बसतो. स्वाभिमानाने, चांगल्या शिक्षणाने तंदुरुस्त असलेल्या घरात अर्धांगवायू झाल्यासारखी परिस्थिती निर्माण होते. म्हणूनच समाजातील सशक्त असा युवावर्ग जर व्यसनाने निष्क्रिय होत असेल तर देशाचे एक सामाजिक अंगच गलितगात्र झाल्यासारखी परिस्थिती उद्‌भवेल. आज भारत हा जगातील सर्वात मोठा युवाशक्ती असलेला देश आहे. कदाचित याचाच गैरफायदा घेऊन जगातील मादक पदार्थांची तस्करी किंवा विक्री करणारे लोक भारतातल्या युवकांना आपल्या नादी लावत असावेत.अनेक पार्ट्यांमध्ये वापरले जाणारे एस्क्टॅसी, एलसीडी किंवा कोकेन ही मादक द्रव्ये उच्चभ्रू तरुणवर्गामध्ये विशेषत्वाने आढळतात. अगदी अलीकडच्या काळात भारतातील मद्य उत्पादकांनी बिअर ही शरीराला उपयुक्त आहे असे वातावरण निर्माण करून एखाद्या सॉफ्टड्रींकसारखी त्याची विक्री सुरू होते. परंतु याच बिअरमधील अल्कोहोलने अनेक तरुणांना सवयीचे गुलाम बनवले आहे. प्रामुख्याने ही सगळी मादक द्रव्ये मोठ्या प्रमाणात पाश्चात्य आणि अरब देशांतून येत असल्याचे दिसून येते. तरुणांच्या जीवाशी खेळ करणारा हा सगळा प्रकार आता धोकादायक वळणावर येऊन पोहचला आहे.

## आत्मभान हरवते आहे

आज थर्टीफस्टच्या निमित्ताने सदिच्छा किंवा शुभेच्छांपेक्षाही या पार्टीबाजपणालाच ऊत येतो. त्यातून चांगले काही हाती लागण्यापेक्षा वाईटाचेच धनी होण्याची भीती निर्माण होते. एकीकडे हा व्यसनांचा आणि रंगारंग दुनियेचा भूलभुलैय्या तर दुसरीकडे दिवसेंदिवस दुरावत चाललेले नातेसंबंध, कुटुंबा-कुटुंबामध्ये वाढत असलेले विसंवाद व त्यातून तरुणवर्गामध्ये निर्माण होणारी न्यूनगंडाची आणि एकटेपणाची भावना, मित्रामित्रांमधली विचित्र स्पर्धा, हेवेदावे आणि नोकऱ्यांमधले ताणतणाव या सगळ्या समस्यांना पुरून उरण्याची शक्ती आजच्या तरुणाजवळ दिसून येत नाही. कारण त्याच्यामध्ये ज्या वयात हे नैतिक बळ वाढवण्याची काळजी घेतली जायला हवी असते ती घेतली जात नाही. आणि मग तरुणाईच्या एका जोशामध्ये तो अशा व्यसनांच्या अधीन होतो. नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच त्यांच्या रेडिओवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमात भारतातल्या तरुणांमधल्या व्यसनाधीनतेबद्दल चिंता व्यक्त केली होती. यामध्ये केवळ तरुणांना दोष देता येणार नाही तर त्यांच्या अवतीभोवती असलेल्या परिस्थितीचा फार मोठा वाटा आहे.ती परिस्थिती बदलण्याचे काम किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम हे घरातल्या पालकांना, नातेवाईकांना, शाळेतल्या शिक्षकांना, कॉलेजमधल्या प्राध्यापकांना एवढेच नव्हे, तर समाजातल्या प्रत्येकालाच करावे लागणार आहे. आजच्या या सगळ्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात सुखसोयींचा चमचमाट आणि लखलखाट दिसून येतो. परंतु त्यातच आपली नेमकी वाट कोणती आहे, याचे आत्मभान हरवण्याची शक्यता असते.